Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 2 | Aug – 2015

वर्तमान वर्तविणारी कविता : 'शेतकरी'

जानन नामदेव जाधव
मराठी विभाग, सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
जाफ्राबाद, जि. जालना

सारांश:

फकीरशा महिबूब शहाजिंदे यांनी निधर्मी (१९८०) आणि आदम (१९९१) या दोन काव्यसंग्रहांबरोबर शेतकरी (१९८५) नावाचे दीर्घकाव्यही लिहिले आहे. 'शेतकरी' हे एक खंडकाव्य असून आजच्या एका शेतकऱ्याने अत्यंत निर्मळ मनाने केलेले ते प्रांजळ आत्मकथन आहे. या खंडकाव्याचा निवेदक आणि नायक हा कष्टाळू, श्रद्धाळू, परंपरावादी विचार मानणारा हाडाचा शेतकरी आहे. कवीने ग्रामीण भागातील समाजरचना, तेथील शेतकरी, त्यांचे जीवन, त्यांच्या समस्या, त्यांचे परस्पर संबंध आणि त्यांचे एकूणच जगण्या-मरणाचे प्रश्न अभ्यासले आणि या खंडकाव्यातून हाताळले आहे. 'ग्रामीण', 'खेडी', 'शेती' वगैरे शब्दांच्या आधारावर राजकीय जीवन जगणाऱ्या 'पुढाऱ्यांची' या शेतकऱ्यांच्या खोल गेलेल्या डोळ्यांत डोकावून पाहावयाची, राबलेल्या चेहऱ्यावर नजर फेकायची, घट्टे पडलेल्या हातात हात घालायची हिम्मत चाळीस वर्षात झाली नाही. ती प्रा.फ.म.शहाजिंदे यांनी 'शेतकरी' काव्यसंग्रहात व्यक्त केली आहे.

प्रस्तावना :–

'शेतकरी'मध्ये कवीने एकूण ग्रामीण जीवनाचेच नव्हे तर खेड्यातील बदलत्या परिस्थितीचेही अत्यंत सुबोध आणि स्वाभाविक चित्रण केले आहे. प्रतिकूल निसर्ग, राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष, भांडवली अर्थव्यवस्था, नफेखोर वाणिज्यव्यवहार यांच्या तावडीत सापडलेल्या शेतकऱ्यांचे प्रातिनिधिक चित्र प्रस्तुत दीर्घ काव्यात आढळून येते. शेती हा ग्रामीण जीवनातील महत्त्वाचा व्यवसाय आहे. f बहु-ना ृषिव्यवसाय हाच ग्रामीण भागातील मुख्य व्यवसाय आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हा व्यवसाय कायमचा उपेक्षित राहिला. शेतकऱ्यांच्या वाट्याला सातत्याने वेगवेगळ्या समस्या येत राहिल्या. ह्या विविध समस्यांना या काव्याचा नायक सहजपणे आत्मनिवेदनाच्या पातळीवर वाचा फोडतो. शेतकऱ्यांचे खरेखुरे जीवन संपूर्ण तपशिलांनिशी मांडणे म्हणजे त्याचा एकूण जीवनसंघर्ष उभा करणे, हे मोठे आव्हान आहे. शहाजिंदे यांनी मराठी कवितेत आपल्या दीर्घकाव्याने हे आव्हान पेलले आहे.

शेतकऱ्याचा घामाचा दाम त्याला तोलून मिळत नाही. याचा अर्थ त्याचे आर्थिक शोषण होते. ही पिळवणूक हेच त्याच्या वाट्याला येणाऱ्या अनर्थाचे मूळ आहे. प्रतिकूल निसर्ग तर त्याचा एक नंबरचा शत्रू आहे. तलाठी-ग्रामसेवकांपासून तहसिलदार-जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत, गावातल्या पुढाऱ्यापासून राजधानीतल्या मंत्र्यापर्यंत, शेतातल्या मजुरापासून तर माल खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यापर्यंत सारेचजण शेतकऱ्यांची मुस्कटदाबी करतात. हे सारेजण त्याला पावलोपावली वेठीस धरतात. दैववादामुळे, धर्मभोळेपणामुळे त्याला हे साऱ्या आपल्या नशिबाचेच भोग वाटतात. तो ते निमूटप स्वीकारतो. आपल्या शोषणाचे, आपल्यावरील अन्यायाचे आणि आपल्या पिळवणुकीचे एक अपरिहार्य वास्तव त्याने स्वीकारलेले असते. शेतकऱ्याच्या मनोगतातून, प्रस्तुत वस्तुसिस्थिती, कवीने सहजपणे नोंदविलेली आहे.

"... कामं करून घियाची म्हंजी आसंच करावं लागत्यय
म्हंजी दोनशे तहसीलदार खानार
शंभर तलाठी खाणार
आन नामंजूर झालेलंच मंजूर होणार
हाय का नाही कायदा मस्त!... (शेतकरी, पृ. १३२)"

निसर्गाचा लहरीपणा, मजुराचा कामचुकारपणा, दैनंदिन जीवनातील गावकी-भावकी, व्यापाऱ्यांची स्वार्थीवृत्ती, पुढाऱ्यांचा भ्रष्टाचार, मजुरांच्या जागृतीमुळे गुत्त्यानं काम घेण्याची व्यवहारी वृत्ती, खतं-बिया□-औषधी-मजुरी यांचे सतत वाढणारे भाव, जमीन विकत घेऊनही आपला हक्क न सोडता बलुतेदार, ऊसाची शेती नसतानाही केवळ मतासाठी साध्या शेतकऱ्याला शेअर्स विकणारे साखर कारखानदार, व्याजाने पैसे वाटणारे खाजगी सावकार इत्यादी सारे घटक आपापले पाश शेतकऱ्यांभोवती आवळत आहेत. खेड्यातील या बदलत्या वास्तवाचे सर्वांगीण चित्रण हे या खंडकाव्याचे बलस्थान आहे. खेड्यात पूर्वीचा जिव्हाळा, आपलेपणा राहिला नाही. जो तो केवळ तात्पुरते, स्वत:पुरते आणि मतलबापुरते पाहतो आहे, हे सांगताना कवीने म्हटले आहे की,

"...सगळ्यांची मनं फाटलेली हायीत
सगळं जगच बदललैय
नोकरदार शेफारलेत साव□ार शेफारलेत
सरकार तर शपथाबी खात्यय
आन शपथा खावून पैसाबी खात्यय
मजुरदार तर कुच्चरपन करू लागलेत..." (शेतकरी, पृ. १०९)

'शेतकरी'मध्ये शेतकऱ्यांच्या जीवनातील दु:खमालिकाच आपल्यापुढे उभी राहते. त्यातून त्याचे कुटूंब, त्याचा गावगाडा, त्याचा ग्रामीण समाज आणि या साऱ्यांना वेढून असलेले दु:खांचे सावट आपले लक्ष वेधून घेते. त्यामुळे त्याचा जीवनसंघर्ष किती वेगवेगळ्या पातळीवरचा असतो, याचीही खात्री पटते. मजूर, बलुतेदार, भुरटे चोर, मागतकरी यांच्या अडवणुकीमुळे तो वैतागलेला असतो, पण कुटुंबातले लोकही त्याला साथ देत नाही, तेव्हा तो हतबल होतो.

"...सगळीकडे अडवणु□च हाय
घरचे लोकं तर मग काय बगायचं हाय?
ज्येच्या त्येने एवढं शेत हाय ह्या
भूसनमंदीच राहत्येत
मरनाऱ्यानंच मरावं सगळं बगावं
हामी म्हंजी बसून खानार
नाही तर मग द्या वाटून
माजं काय हाय?
मिठाच्या खड्यासारखे दोन पोर हायत्ये
बसून खाल्लो तर सरनार नाही
आसं एकजन म्हननार आन दुसरा-
मला □ाय मूल □ा बाळ?
□स्याला करू काम आन घामं?
□ुणासाठी करायचं जीवाचं रान?..." (शेतकरी, पृ. ११३)

'शेतकरी'मध्ये शेतकऱ्याच्या एकूण, संपूर्ण जीवनाला कवीने जणू प्रदक्षिणा घातली आहे. त्यात खेड्यातील रोजगारी स्त्रीची मानसिकता, अगतिकता आणि क्वचित प्रसंगी प्रकटणारी अनैतिकताही आहे. जीवन जगताना शेतकऱ्याला पदोपदी निसर्गाशी संघर्ष करावा लागतो आणि त्यातून जी शारीरिक आणि मानसिक पातळीवर ओढाताण होते, त्याची तर या खंडकाव्यात पावलोपावली प्रचिती येते. शेतकरी जीवनाच्या असंख्य अस्मानी-सुलतानी अडचणींचा पाढा तर कवीने वाचलेलाच आहे. पण त्याचबरोबर वीजखाते, महसुल विभाग, गाव, तलाठी, बँका, साखर कारखाने, पंचायत समिती यांच्याशी त्याचा जो संबंध येतो, तेव्हा त्याची जी होरपळ आणि घुसमट होते, तिचेही दर्शन घडविले आहे.

'शेतकरी'मध्ये वर्तमान राजकीय जीवनावरही भाष्य आहे. सरकारने जाहीर केलेल्या योजना, मदत, सबसिडी, सवलती शेतकऱ्यांपर्यंत पोहत नाही, सरकारी कार्यालयात, सोसायट्यात त्याला तुच्छतेची वागणूक मिळते. तेव्हा तो आपल्या अगतिकतेवर चिडतो, त्यालाही पेटून उठावं असं वाटते. आपली बाजू खरी असूनही आपल्यावर अन्याय होतो, आपले शोषण होते, याची त्याला चीड येते. आपण निग्रहाने निकराचा लढा उभारला तर आपले न्यायहक्क आपणास मिळतील असा आशावाद या शेतकरी कवीने उभा केला आहे.

फ.म.शहाजिंदे यांनी गाव, शेतकरी, बाप, हामचा समाज अशी काही दीर्घ कविता लिहिल्या. त्यांना शेतीची पार्श्वभूमी होती. त्यामुळे प्रत्यक्ष शेती करण्याचा अनुभव आला. हा व्यवसाय किती आतबट्ट्याचा आहे, याची खात्री पटली. म्हणून त्यांना शेती प्रश्नांच्या गांधीलमाश्या डसू लागल्या, त्याची परिणती काव्यलेखनात होऊन त्यांनी सुमारे दोनशे पन्नास पृष्ठांचे 'शेतकरी' नावाचे खंडकाव्य लिहिले. कवी म्हणतात

त्याप्रमाणे हे काव्य अनेक शेतकऱ्यांचा प्रातिनिधीक आत्मोद्गार आहे. प्रत्यक्ष खेड्यातला शेतकरी या खंडकाव्यात साकार झाला आहे. त्याच्या भावना, त्याचे विचार, त्याचे समज-गैरसमज, त्याच्या श्रद्धा आणि त्याची एकूण गुंतागुंतीची कृषिवल संस्कृती येथे आपले मातीचे रूप घेऊन आली आहे. त्याचे आत्मकथन अघळ-पघळ, ऐसपैस, गोष्टीवेल्हाळ आहे, पण ते एकसूरी नाही. 'काय करावं, कसं करावं?' हे दोन प्रश्न या कवितेचे जणू ध्रुपद आहे. 'गळचेपी सहन होत नाही, पण चिडून पेटून उठताही येत नाही', अशी थकवणारी अगतिकता ही या कवितेची स्थायीवृत्ती आहे. या दीर्घकाव्यात शेतीव्यवसायाचे बारकावे आहेत, शेतकऱ्यांच्या अवती-भवती वावरणारी नमुनेदार माणसं आहेत, थोडा पाल्हाळ आही ठिकाणी कंटाळवाणा वाटतो, कवितेची भाषा मराठवाडी बोली आहे, तिची लय अन् गोडवा काळजाला भिडतो. पण अभिव्यक्ती काहीशी अनघड असली तरी प्रामाणिक आहे. एकूण शेती आणि शेतकरी जीवनाचा संपूर्ण संघर्षमय अन् कष्टपूर्ण जीवनपट मांडण्यात कवीला लक्षणीय यशप्राप्त झाले आहे. शेतकऱ्यांच्या व्यथावेदनांचे हे घोंघावते मोहोळ आहे.

अशा प्रकारे निवेदन, मनोगत, तपशील, म्हणी, वाक्प्रचार, शिव्या-सुविचार यांचा विलक्षण मेळ असलेले मराठवाड्याच्या मातीतील, अस्सल बोलीत साकार झालेले एक हे महत्त्वाचे दीर्घकाव्य आहे. येथे कलाकुसर, भाषेचा नखरा, कलात्मकतेचा नटरंगीपणा आढळत नाही. पण शेतकरी, त्याचे काबाडकष्ट, त्याचे शोषण, त्याच्यावर होणारा अन्याय, त्याचा कौटुंबिक कलह, त्याच्या वाट्याला येणाऱ्या आपत्ती आणि एकूणच जीवघेणा जीवनसंघर्ष याचा भरघोस, दस्तऐवज म्हणजे 'शेतकरी' हे खंडकाव्य होय.